REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2025

# १८७६-७८ चा भारतातील दुष्काळ :"वऱ्हाड सामाचार" ची पत्रकारिता

सतीश बंडूसिंग राठोड[1] , प्रो.डॉ. संगीता मेश्राम[2]
[1]सहायक प्राध्यापक इतिहास, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर.
[2] माजी विभागप्रमुख,इतिहास विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर, विद्यापीठ नागपूर.

**गोषवरा:**

राजकीय, सामाजिक, आर्थिक, आणि वैचारिक जागृतीचे कार्य 'वऱ्हाड समाचार' नी इंग्रजी सत्तेची कोणतीही भीती न बाळगता निर्भीडपणे केले. शिक्षणाचा आग्रह , स्त्री शिक्षण , विधवा पुनर्विवाह अशा सामाजिक मुद्द्याबरोबरच प्रशासकीय सेवेत भारतीयांचा अंतर्भाव गरजेचे राष्ट्रीय सभेला पाठींबा, राजकीय चळवळी करिता भारतीय जनमानस तयार करणे या बाबतीत पत्राचे लिखाण उल्लेखनीय होते . सामाजिक आणि राजकीय लिखाणा इतकेच 'वऱ्हाड समाचार' पत्राचे अर्थविषयक लिखाण महत्वपूर्ण होते.इंग्रजांच्या आर्थिक धोरणातील दोष आणि त्यामुळे भारतीयांचे होणारे शोषण या बाबतीत , रेल्वे, शेतसारा, दुष्काळ, आयात-निर्यात धोरण या संबंधाने पत्राच्या अग्रलेखातून मांडलेले विचार पत्रकर्त्याचे अर्थशास्त्रविषयक आकलनाचे उत्तम उदाहरण तर आहेच परंतु भारतीयांच्या आर्थिक जागृतीविषयक पत्राच्या महत्वपूर्ण योगदानाचा ऐतिहासिक पुरावा आहे. दुष्काळ विषयक लिखाणातून त्यांच्यातील लोकहितदक्ष , देशभक्त आणि निर्भीड पत्रकारितेचे दर्शन होते.



**गृहीतक:** "वऱ्हाड समाचार " या वृत्तपत्राने आर्थिक जागृतीच्या क्षेत्रात विपुल कार्य केले आहे.

**उद्देश:**

"वऱ्हाड समाचार " चे भारताच्या इतिहासातील अर्थविषयक जागृतीचे योगदान त्याचे अध्ययन करून ते सर्वसामान्य वाचकांकरिता व संशोधाकाकरिता उपलब्ध करून देणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंधा करिता शास्त्रीय ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला असून त्या करिता"वऱ्हाड समाचार " या वृत्तपत्राच्या मुळ अंकाचा अध्ययनासाठी उपयोग करण्यात आलेला आहे .शोधनिबंध प्रामुख्याने प्राथमिक साधनावरच आधारित आहे .

**कळीचे शब्द:**

मानवी उत्क्रांतीचा इतिहास अनेक रंजक आणि क्रांतिकारी शोधाचा राहिला आहे .पृथ्वीतलावरील सर्वात बुद्धिमान प्राणी असलेला मानव त्याच्या निरीक्षण क्षमतेमुळे येथील एक एक गोष्टीचा उलगडा करत गेला त्यातून त्याच्या ज्ञानात भर पडत गेली. यामागे मानवाचा जिज्ञासू स्वभाव कारणीभूत होता ,प्रत्येक गोष्टीबद्दल जाणून घेण्याची तीव्र इच्छामानवाच्या स्वभावाचा नैसर्गिक पैलू आहे. याकरिताच सांकेतिक भाषा, पुढे ध्वनी संकेत , मग भाषेचा झालेला विकास हे माहितीआदानप्रदान सहज व्हावी याकरिताच माणसाने केलेल्या प्रयत्नांची उदाहरणे आहेत. पुढे मुद्रण कलेचा शोध लागल्याने माहितीजन्य ज्ञानाचा प्रसार करणे सोपे झाले, आज मानवाने तंत्रज्ञानात कल्पनातीत विकास साधला आहे . आणि संपूर्ण जगाची माहिती तो खिशात घेऊन फिरतोय हे जरीखरे असले तरी त्यापूर्वी आधुनिक काळातील ज्ञान प्रसाराचे, आणि समाज प्रबोधनाचे महत्वपूर्ण साधन म्हणून वृत्तपत्रांचे योगदान उल्लेखनीय आहे त्यामुळे नवीन बातमी जाणून घेण्याची उत्सुकता प्रत्येकात असते. मानव समूह करून राहू लागल्यानंतर इतरांकडून माहिती जाणण्याचीआणि आपल्याकडे असलेली माहिती देण्याची हि नैसर्गिक उत्सुकताच वृत्तपत्रं जन्माला येण्यामागील प्रमुख प्रेरणा होय . वृतपत्रामुळे मानवाला बातमी वाचण्याची आवड लागली असे नव्हे तर मानवाला बातम्याची आवड होती म्हणून वृत्तपत्र निघाली हे जास्त संयुक्तिक आहे .

भारतात युरोपियनांच्या आगमनानंतर मुद्रण कलेचा अंतर्भाव झाला आणि बराच काळ गेल्यानंतर युरोपियनांच्या प्रयात्नाने वृत्तपत्रांची सुरवात झाली. कलकत्त्याला १७८० ला जेम्स ऑगस्टस हिकी यांनी 'बेंगाल गॅझेट' हे भारतातील प्रथम वृत्तपत्र सुरु केले. सुरवातीला भारतात निघालेली वृत्तपत्रे हि इंग्रजांनी इंग्रजांकारिता सुरु केलेली इंग्रजी वृत्तपत्र होती त्यात भारतीयांचे प्रतिबिंब नव्हते . पण कालांतराने देशी भाषिक वृत्तपत्रानाही सुरवात झालीभारतीय भाषेतून निघणारे प्रथम मासिक होते 'दिग्दर्शन'. १८१८ ला श्रीरामपूर येथील मिशनऱ्यांनी ते सुरू केले. हेच मासिक २३ मे १८१८ पासून साप्ताहिक म्हणून सुरू झाले बंगाली भाषेतून निघणारे हे वृत्तपत्र देशी भाषिक प्रथम वृत्तपत्र होय.[1] बंगाल च्या मानाने महाराष्ट्रात मराठी भाषेतून वृत्तपत्र सुरु व्हायला दशक लोटावे लागले . मराठी भाषेतून निघणारे प्रथम वृत्तपत्र होते 'मुंबापुर वर्तमान' हे पत्र १८२८ ला मुंबई येथून निघणारे प्रथम मराठी वृत्तपत्र होते . परंतु त्याचे अंक उपलब्ध नाही तसेच संपादक कोण हेही कळत नाही त्यामुळे मराठीवृत्तपत्राचा खरा पाया रचला तो१८३२ ला मुंबई येथून सुरु झालेल्या जांभेकरांच्या'दर्पण' नी.[2] या नंतर महाराष्ट्रातील इतर भागातही मराठी वृत्तपत्रांना सुरवात झाली परंतु विदर्भात मात्र मराठी वृत्तपत्र सुरु व्हायलाथोडा विलंबच झाला एकतर हा मालगुजारीचा प्रदेश त्याच बरोबर इंग्रजांच्या सत्तेखाली उशीराच आला त्यामुळे शिक्षणादि सुधारणाही महाराष्ट्रातील इतर प्रदेशांच्या तुलनेत उशिरा सुरु झाल्या.१८६७ ला अकोल्याहून निघणार्या 'वऱ्हाड समाचार' नी विदर्भातील हि उणीव भरून काढली . खंडेरावजी फडके यांनी हे वृत्तपत्र सुरु केले होते पुढे त्यांचे पुत्र नारायणजी फडके यांनी सुद्धा हे पत्र चालू ठेवले'वऱ्हाड समाचार' हे विदर्भाचे प्रथम मराठी वृत्तपत्र होते जनजागृतीच्या क्षेत्रात या पत्राचे अमुल्य योगदान राहिले आहे

राजकीय, सामाजिक, आर्थिक, आणि वैचारिक जागृतीचे कार्य 'वऱ्हाड समाचार' नी इंग्रजी सत्तेची कोणतीही भीती न बाळगता निर्भीडपणे केले. शिक्षणाचा आग्रह , स्त्री शिक्षण , विधवा पुनर्विवाह अशा सामाजिक मुद्द्याबरोबरच प्रशासकीय सेवेत भारतीयांचा अंतर्भाव गरजेचे, राष्ट्रीय सभेला पाठींबा, राजकीय चळवळी करिता भारतीय जनमानस तयार करणे या बाबतीत पत्राचे लिखाण उल्लेखनीय होते . सामाजिक आणि राजकीय लिखाणा इतकेच 'वऱ्हाड समाचार' पत्राचे अर्थविषयक लिखाण महत्वपूर्ण होते.इंग्रजांच्या आर्थिक धोरणातील दोष आणि त्यामुळे भारतीयांचे होणारे शोषण या बाबतीत , रेल्वे, शेतसारा, दुष्काळ, आयात-निर्यात धोरण या संबंधाने पत्राच्या अग्रलेखातून भूमिका मांडताना पत्रकार्त्याचे अर्थशात्रविषयक आकलनाचे उत्तम उदाहरण तर आहेच परंतु भारतीयांच्या आर्थिक जागृतीविषयक पत्राच्या महत्वपूर्ण योगदानाचा ऐतिहासिक पुरावे आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय '१८७६-७८ चा भारतातील दुष्काळ : "वऱ्हाड सामाचार" ची पत्रकारिता' असल्याने या संदर्भातील पत्राच्या विचाराचे परीक्षण करणे अधिक उचित राहील.

[1] मेश्राम संगीता, राजकीय प्रबोधन आणि मराठी वृत्तपत्रे,विसाबुक्स प्रकाशन ,नागपूर,२००८ पृ. ६

[2] लेले.रा.के.,मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणेचतुर्थ आवृत्ती २०२० पृ ५८.

**दुष्काळ:**

मानवनिर्मित व नैसर्गिक असे दोन प्रकारचे दुष्काळ असतात त्यापैकी भारतात नैसर्गिक दुष्काळाचे प्रमाण अधिक असल्याचा इतिहास आहे. नैसर्गिक दुष्काळ ही प्रामुख्याने पर्जन्य अभावी पडणारा कोरडा दुष्काळ आणि खूप जास्त पर्जन्य झाल्याने पडणारा ओला दुष्काळ असे दोन प्रकार पडतात. यापैकी कोरडा दुष्काळ अधिक वेदनादायी असतो. भारतात जो दुष्काळांचा इतिहास आहे त्यात या कोरड्या दुष्काळाचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते.

प्राचीन काळापासून भारतात दुष्काळ पडत असल्याचे अनेक उल्लेख सापडतात. ऋग्वेद, महाभारत, जैन व बौद्ध साहित्य, अर्थशास्त्र आदि मधे दुष्काळा संबंधित उल्लेख केला गेला आहे. मध्ययुगीन भारतातही काही दुष्काळ पडल्याच्या नोंदी समकालीन ऐतिहासिक साधनात सापडतात. परंतु त्याची तीव्रता किती, झालेली मनुष्यहानी आदीबाबत अचूक माहिती मिळण्यास प्राचीन व मध्ययुगीन स्त्रोता बाबत अनेक मर्यादा पडतात. परंतु आधुनिक भारतात ब्रिटिश अंमलाखालीलप्रदेशात जी दुष्काळे पडलीत त्यासंदर्भात शासकीय सांख्यिकीय माहिती प्रचुर प्रमाणात उपलब्ध आहे. एक साम्राज्यवादी व्यापारी सरकारच्या नोंदीत काहि गफलत असण्याची किंवा दुष्काळ निवारणार्थ केलेल्या कार्याची बढून चढून दिलेली माहिती तसेच मनुष्यहानी बाबतीत कमी आकडे देऊन स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न सरकार स्तरावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या माहितीचे पुनःपरिक्षण तत्कालीन वृत्तपत्राचे वार्ताकन व लेख यातून करणे शक्य होते व समकालीन वृत्तपत्र खासकरून देशी भाषिक वृत्तपत्र यासंदर्भात अधिक विश्वसनीय ठरतात कारण परकीय सरकारच्या अंतर्गत आपल्या देश बांधवांच्या समस्यांशी ते अधिक समरस होतात.

ब्रिटिश अंमलात प्रामुख्याने १७५७ ते १९४७ दरम्यान अनेक छोटी मोठी दुष्काळ पडली. १७७० मध्ये बंगालचा दुष्काळ, १७९१-९२ मधील डेक्कन चा दुष्काळ, १८६६ ओडिसा आणि बंगाल, १८७६-७८ मद्रास, मैसूर, मुंबई प्रामुख्याने दक्षिण भारत, १८९६-९७ उत्तर व मध्य भारत, पंजाब १९०२, १९०८ आणि १९४३ चा मानवनिर्मित दुष्काळ ही (एकतर प्रादेशिक व्याप्ती किंवा कालखंड यासंदर्भाने) मोठी दुष्काळ पडलीत. यातील १८७६-७८ दरम्यान पडलेल्या दुष्काळासंदर्भात विदर्भाचे पहिले मराठी वृत्तपत्र वऱ्हाड समाचारने केलेले वार्तांकन व लिहिलेले अग्रलेख समकालीन स्त्रोत म्हणून खूप महत्त्वाचे आहे. दुष्काळ प्रभावीत क्षेत्रातील लोकांच्या दुःखाशी समरस होऊन अगदी पोटतिडकेने 'वऱ्हाड समाचार' ने केलेले लिखाण, इंग्रज सरकारची भूमिका, झालेली मनुष्य आणि वित्तहानी त्याचे परिणाम आधीचे सखोल विश्लेषण करण्यास मदत करते.

**'वऱ्हाड समाचार' मधून १८७६-७८ च्या दुष्काळाचे स्वरूप**

१८७६-७८ दरम्यान दक्षिण भारत व महाराष्ट्रातील काही भाग तीव्र दुष्काळात सापडला होता. २२.१०.१८७६.च्या अंकात 'भयंकर दुष्काळ व निवारणार्थ तजविजी'[3] या शीर्षकाच्या महाराष्ट्रातील दुष्काळ प्रभावित क्षेत्र आणि लोकांच्या समस्याया बाबतीत पत्रकर्ते लिहितात की, '... महाराष्ट्र देशातील दुष्काळ प्रथम लहान आहे असे वाटले होते... परंतु आता असे कळते की त्या दुष्काळ रोगाचे स्वरूप बरेच उग्र आहे व त्याची व्याप्ती ही मोठी आहे. म्हणजे खानदेश, अहमदनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कलादगी आणि धारवाड या सात जिल्ह्यात दुष्काळ आहे. याचा विस्तार ११००० चौरस मैल आहे व त्यात ४ लक्ष्यांची वस्ती असून मनुष्य ३,१८,६०० आला वाचून विपत्तीत आहेत.'[4] म्हणजे प्रामुख्याने उत्तर व पश्चिम महाराष्ट्रातील प्रदेश या विपत्तीत अडकलेला होता. लक्षावधी लोकसंख्येच्या या प्रदेशात पावसाअभावी अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली होती.

१८७६-७८ चा दुष्काळ जवळपास संपूर्ण मद्रास प्रांतात होता त्यामुळे मद्रास प्रांताची स्थिती फार गंभीर स्वरूपाची होती. १८७६ मध्ये पावसाने हुलकावली दिल्याने १८७७ मध्ये पाऊस आला तर लोकांना दिलासा मिळाला असता परंतु १८७७ मध्ये ही परिस्थिती

[3] वऱ्हाड समाचार, अंक ४२ दिनांक २२ ऑक्टोबर १८७६, अकोला, पृ. २

[4] कित्ता

बदललेली नाही आणि दुष्काळाने भयंकर रूप धारण केले.[5] तत्कालीन मद्रास प्रांतातील स्थितीचे वर्णन पत्रकर्ते पुढील शब्दात करतात '... मेघराजाने दर्शन द्यावे पुन्हा महिना पंधरा दिवस काही नाही असे बहुदा सर्वत्र चालले आहे त्यामुळे याचा अखेर परिणाम काय होतो तो कळत नाही. यंदाही जर गुदस्तांची पाळी आली तर खरोखरी लक्षावधी लोक मेल्या वाचून राहणार नाहीत ... आणि आतातर देशात धान्याचा पुरवठाच राहिला नाही मग कोट्यावधी जीव कसे जगावे'[6] संपूर्ण मद्रास प्रांतात वर उल्लेखित स्थिती पाऊस न झाल्यामुळे निर्माण झाली होती व कोट्यावधी लोक या दुष्काळाच्या भीषण संकटाच्या सावटात असल्याची माहिती पत्रकर्ते देतात.[7] यातून हा दुष्काळ पावसाच्या अभावामुळे पडला, आणि त्यामुळे महागाई , उपासमार यात प्रचंड वाढ झाली लोक वेदनेनी मृत्युच्या छायेत जगत होती हे स्पष्ट होते.

## दुष्काळात झालेली हानी: पत्राचे विश्लेषण

१८७६-७८ चा दुष्काळ महाराष्ट्रातील काही भाग व प्रामुख्याने दक्षिण भारतात अधिक प्रदेशात होता. वऱ्हाडातील वाशिम व लगतच्या प्रदेशात याची विशेष झळ पोहचली नव्हती तेव्हा महाराष्ट्रातील इतर प्रभावीत क्षेत्रातून जीव वाचवण्यासाठी लोकांनी स्थानांतर केले. स्थानांतरित लोकांचे हाल आणि त्यामुळे वाशिम मध्ये निर्माण झालेल्या समस्यांचे वर्णन करतांना पत्रकर्ते लिहितात, ' ... दुष्काळ पीडित प्रांतातून गुणी लोक एका मागून एक येत आहेत भिकाऱ्यांची गर्दीत झाली आहे. पंढरपूर, सोलापूर व मोगलाईतील लोकांचे थवेचे थवे दररोज येऊन अन्न अन्न करीत दारोदार फिरत आहेत... तशाच दुष्काळ पीडित प्रांतात माल पाठवावा या हेतूने अकोला, औरंगाबाद येथील व्यापाऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊनमाल घेऊन जाऊ लागल्या... मग लोकांची स्थिती लिहिणेच नको. सर्व लोक घाबरून गेले बाजारात माल मिळण्याची मारामार झाली. ... दंगे होण्याचा प्रसंग आला बाजारात पोलीस बंदोबस्तास येऊ लागले. बाहेरून आलेल्या लोकांचे तर दुष्काळात तेरावा महिना या म्हणीप्रमाणे झाले ... कित्येक फक्त पाणी पिऊन व कित्येक भाजीपाला मिळेल तो खाऊन राहू लागले.'[8] दुष्काळाच्या दाहकतेची झळ मानवी जीवनाची किती भयंकर अवहेलना करते याचे अगदी बोलकी चित्र, स्थानिक परिस्थितीचे वर्णन करून पत्रकर्ते वाचकासमोर ठेवतात.

या दुष्काळाची झळ मुंबई प्रांतापेक्षा मद्रास प्रांताला अधिक पोहोचली होतीयेथे जनसामान्यांचा जगण्याचा संघर्ष पराकोटीला पोहोचला होता. लक्षावधी लोक या प्रांतात उपासमारीने मृत्यू झाली होती 'स्टेट्समन' वृत्तपत्राच्या बातमीचा हवाला देत पत्रकर्ते समकालीन घटनाबाबत लिहिताना, ' ... मद्रास इलाख्यात रस्त्यांच्या बाजूने अन्नवाचूनमेलेल्या मनुष्यांची प्रेते गेले महिन्यात ११४ सापडली व या महिन्यात एका आठवड्यात १५ सापडली असे स्टेट्समन नावाच्या वृत्तपत्रात लिहिले आहे व असेच पुढे चालले तर दुःखीताचा काय परिणाम होईल.[9] निसर्ग कोपल्यामुळे मानवी जीवांचे होणारे नुकसान मानवांच्या नियंत्रणा बाहेर असते व अशा परिस्थितीत किड्या माकोड्यासारखी मानवी जीवाची किंमत होते. जिथे माणसेच अनाथ जनावरासारखी मरत होती, तिथे आर्थिक हानी किती झाली असेल याची कल्पना येते.

## दुष्काळ निवारणार्थ सरकारचे धोरण: वऱ्हाड समाचार चे मत

इंग्रज अंमलात भारतात अनेक दुष्काळ पडली. इंग्रजापूर्वी मुघल व सल्तनत काळातही दुष्काळ पडल्याचा इतिहास आहे दुष्काळात लोकांचे प्रचंड हाल होतातइंग्रज पूर्वीच्या काळातही होत होते त्या त्या वेळच्या सत्तांनी त्यांना जमेल तसे निवारणार्थ कार्य केले होते. परंतु इंग्रजासारखे सांख्यिकीय माहिती संकलित करून नियमबद्धपणेकागदोपत्री का असेना त्यापूर्वीच्या सामंतशाही काळात याबाबतीत कार्य झाले नाही. सामंतशाहीची वैशिष्ट्ये, सत्तेचा निरंकूश स्वभाव व परिस्थिती सर्वांचा विचार करता सामंतशाही सरकारला

[5] वऱ्हाड समाचार, अंक ३२दिनांक १२ ऑगस्ट १८७७, अकोला, पृ.२

[6] कित्ता

[7] कित्ता

[8] वऱ्हाड समाचार , अंक ३५दिनांक २ सप्टेंबर १८७७ अकोला,पृ,२

[9] वऱ्हाड समाचार , अंक ११दिनांक १८ मार्च १८७७ अकोला, पृ,२

अनेक मर्यादा किंवा अशा सत्तेच्या प्रवृत्तीतच ते नसते त्यामुळे १८७६-७८ च्या दुष्काळात इंग्रजांकडून दुष्काळग्रस्त क्षेत्रात लोकांकरिता काढलेली रस्त्याची कामे, रेल्वे, तलाव आधीची कामे काढून इंग्रजांनी लोकांना जगण्याची उमेद दिली. पत्रकर्ते मुघल-मराठा या मध्ययुगीन सरंजामशाही काळाची तुलना करतांना या दुष्काळ निवारण कार्याबाबतीत इंग्रजांची स्तुती करतांना... त्याकाळी महाराष्ट्र देशात पेशव्यांचे राज्य होते व त्याचा मोठा जलसा होता आणि अशा ब्राह्मण शाही राज्यात प्रजेचे दुष्काळामुळे अतिशय हाल झाले, कित्येकानी जीव दिले, कित्येक धर्म भ्रष्ट झाले, कित्येकांच्या स्त्रियांवर यवनांचे जुलूम झाले ही भयंकर स्थिती मनात आणली असता हल्ली परमेश्वराने आपणास इंग्लिश सरकारच्या अंमलात ठेवले आहे हे त्याचे मोठे कृपादान समजले पाहिजे'[10] या शब्दात इंग्रजांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करतांना दिसतात. पण याचा अर्थ असा नव्हे की, इंग्रज हे एक व्यापारी व नफा तोटा ग्राह्य धरून कार्य करणारे सरकार होते याची जाणीव पत्रकर्त्यांना नव्हती. इंग्रजांच्या अर्थनीतीच्या बारकाईने अभ्यास पत्रकर्त्यांचा होता. वरील केलेले स्तुती अपवादात्मक होती. जिथे जिथे लोक कल्याण कार्यात इंग्रज सरकारचे धोरण चुकत होते किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्या जात होते त्या त्या वेळेस पत्रकर्ते टिकेची झोड उठवताना दिसतात. पुढील विवेचनातून ते लक्षात येईलच.

१८७६ मध्ये दुष्काळ पडला. प्रभावित क्षेत्रातील लोकांच्या हाल अपेष्टांना पारावर नव्हते उपासमारीने लोक मरत होती. अशा प्रसंगी तात्कालीन व्हाईसरॉय गव्हर्नर जनरल लिटन यांनी १ जानेवारी १८७७ ला दिल्ली दरबाराचे आयोजन करण्याचे योजिले होते. या दोन्ही परिस्थितीच्या अनुषंगाने दिनांक ०५-११-१८७६ म्हणजे दरबाराच्या नियोजित दिवसा अगोदर साधारणता दोन महिने आधी दुष्काळ आणि दरबार किंवा सुखदुःखाचे मिश्रण'[11] या सदराखाली पत्रकर्ते सरकार दरबारावर जी आर्थिक उधळपट्टी करणार होती त्याचे वर्णन करतांना 'हिंदुस्तान सरकार लाखो रुपये खर्चूनथाट माठाचा व डाम डौलाचा दरबार करणार, शेकडो राजे रजवाड्यास ही लाखो रुपये लवाजम्यास व नटण्या मुरडण्यास खर्च होणार... डेरे राहुट्या यांची लय लूट होणार ... उत्तमोत्तम खाद्यपदार्थाच्या पर्वतप्राय राशी पडणार, व पेय द्रव्याचे एकादे सरोवर भरेल अशी पिंपेच्या पिंपे खलास होणार ... कुबेर पुरीतील अविनाशी स्वर्ग सुखाचाच आपण उपभोग घेत आहोत असे वाटावे असा दरबार भरविणाऱ्यांचा उद्देश आहे ही उत्तम गोष्ट आहे!'[12] अशा विविध उपमांचा वापर करून होऊ पाहणाऱ्या दरबारांचे कल्पना रम्य वर्णन पत्रकर्ते करतांना दिसतात. लिटनची देशी भाषिक वृत्तपत्रा संदर्भातील आकस आदी बाबीचा संदर्भ घेता त्यामुळे थेट शब्दाचे तीष्ण बाण सोडून जनतेत सरकार बद्दल रोष निर्माण करण्याचा मार्ग पत्करून आपल्यावर निर्बंध ओढून घेण्यात शहाणपण नव्हते. पण जनकल्याणाचा, जागृतीच्या धर्मापासून फळ काढणे ही पुरुषार्थ नव्हते. म्हणून वरील लक्षावधी रुपये, डामडौलाचा दरबार नटण्या मुरडण्यास खर्च होणार खाद्यपदार्थाच्या पर्वतप्राय राशी पडणार पेय द्रव्याचे सरोवर भरेल व शेवटी या सर्व बाबीला उत्तम गोष्ट म्हणजे हे पत्राचे चातुर्यपूर्ण पत्रकारितेचा नमुना होय. थेट सरकारवर हल्ला न करता तरीही जनतेत सरकारच्या असवेदनशीलते बद्दल जे सुचवायचे ते अप्रत्यक्ष पत्रकर्ते तितक्याच प्रभावीपणे सुचवताना दिसतात.

दुष्काळात विव्हळत असलेल्या करोडो जनसमुदाय आणि त्याचवेळी सरकारचे आपल्या राणीला खुश करण्यासाठी एका दरबारावर भोग विलासावर लाखो रुपयांची उधळपट्टी अगदीच विसंगत होते या परिस्थितीचे वर्णन पत्रकर्ते 'एका हातात सुवर्णभूषणांचा शृंगार व दुसऱ्याच विजेचे यंत्र लावल्याप्रमाणे वेदना का द्याव्या? एका पायात तूप लावून चोळत बसावे व दुसरा विस्तवात भाजत आहे. त्याविषयी निष्काळजी राहावे.[13] अशी उदाहरणे देऊन इतकी पराकोटीची विसंगतता कशी न्याय व संवेदनशील असू शकते असा प्रश्नच करतांना, अर्धा देश उपासमारीने मरत असताना, वेदनेने विव्हळत असताना अशा दरबाराचे आयोजन समयानुकूल तर नव्हतेच त्याचबरोबर त्यावरील खर्च निरर्थक व साम्राज्यवादी परकीय सरकारची स्वार्थी आणि क्रुर प्रवृत्तीचे दर्शन देणारे होते असा निष्कर्ष पत्रकर्ते सहजच वाचकासमोर ठेवताना दिसतात. कायमचनफा तोट्याचा विचार करणारे इंग्रज सरकार लोकांप्रती संवेदनशील होऊन उदारपणे खर्च करण्याची उदाहरणे अपवादात्मक असतील किंवा नव्हतीच. कागदोप्रती लोकांप्रती कनवाळू असल्याचा दिखावा करायचा, सुरुवातीला तसा आव

[10] वऱ्हाड समाचार, अंक २२ दिनांक ३ जून १८७७, अकोला, पृ.२

[11] वऱ्हाड समाचार, दिनांक ५ नोव्हेंबर १८७६, अकोला, पृ.२

[12] कित्ता

[13] कित्ता

आणायचा आणि पुढे जास्त वेळ होतोय हे लक्षात आले कि काही कारणे देऊन हात अखडता घ्यायचा हा इंग्रज सरकारचा स्वभाव होता दिनांक १८-०३-१८७७ च्या अंकात पत्रकर्ते इंग्रजांच्या या धोरणामुळे दुष्काळग्रस्त लोकांची मानसिकता किती खचली होती. याचे वर्णन '... सरकारने या लोकांस सहाय व्हावे एवढं च रिलीफ फंडाची कामे काढली पण अलीकडे मजुरी देण्याचा दर कमी केला तो इतका की, त्यांची पोटे भरेना तशी झाली. त्यामुळे कित्येक लोक कामावर जाऊन अर्धपोटी राहावे त्यापेक्षा निकामी बसून येईल ते संकट सोसावे अशा साहसास कबूल झाले.'[14] या शब्दात सरकारकडून केली जाणारी मदत किती तोकडी होती. तसेच धोरण किती कचखाऊ होते हे वाचकांसमोर पत्रकर्ते मांडतात. खजिन्यावर ताण पडला की सरकार अस्वस्थ व्हायचे. त्याची भरपाई करण्यासाठी लोकांकडून जुलुमाने सारावसुली करायचे. शेतीत उत्पन्न होवो अथवा नाही याच्याशी सरकारला काही घेणे देणे नव्हते. दुष्काळ प्रभावीत क्षेत्रातही इंग्रज सरकारकडून लोकांवर असा जुलूम सुरू झाला तेव्हा पत्रकर्ते सरकारला थेट प्रश्न विचारताना दिसतात 'लोकास पोट भरायची मारामारी पडली आहे असे असता त्यापासून चालू सालचा शेतसारा घेण्याविषयी सरकारने सक्ती लावली आहे ही गोष्ट किती विलक्षण आहे? शेत पेरली नाहीत व त्यात काहीच उत्पन्न झाले नाही तर लोकांनी त्याचबद्दलचा सारा कसा द्यावा व तो सरकारने काय म्हणून घ्यावा?'[15] असे प्रश्न उपस्थित करून सरकारच्या क्रूरतेशी वाचकांना अवगत करतांनाच लोकांप्रती सरकारच्या संवेदना जागाव्या असे प्रयत्न करतांना पत्र दिसते.

### पत्राने सुचविलेल्या उपाययोजना:

१८७६-७८ च्या दुष्काळात इंग्रज सरकारने उपाययोजना म्हणून नियमावली बनविल्या. प्रभावित क्षेत्रातील प्रशासनाला लोकांची मदत करण्याकरिता सजग ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. इतर प्रदेशातून दुष्काळी प्रदेशात मदत पाठविण्याकरिता रेल्वेचा उपयोग करण्यात आला व त्याची फार मदतही झाली. परंतु या ज्या उपाय योजना होत्या त्या दुष्काळ पडल्यानंतर त्याची तीव्रता कमी होईल याकरिता तात्कालीन उपाय योजना होत्या. दुष्काळ पडला तरी एक दोन वर्ष लोकांना कुणाच्या साह्यावर अवलंबून न राहता स्वतःतग धरून राहतील अशा मुलगामी उपायोजनावर सरकारचे लक्ष नव्हते. ही बाब पत्रकर्त्यांना अभ्यासू इंग्रज सरकारकडून दुर्लक्षित व्हावी हे अचंबित करणारी वाटते. त्याबाबत 'इंग्लिश सरकारासारखे दूरदृष्टी सरकार आमच्या देशाचे अधिपती असता त्यांच्या कारकिर्दीत हा प्रकार घडावा हे आमच्या देशाचे दुर्भाग्य होय. रेल्वेची कामे पार झपाट्याने दर साल चालू आहेत तशी कालव्याची नाही ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. दुष्काळ पडल्यावर रेल्वेने बाहेरून माल पोहोचविण्याचा उपयोग होतो ही गोष्ट खरी आहे. पण कालव्याने मुळातच दुष्काळाचे भय बहुतेक नाहीसे होते, ही गोष्ट त्याहून शतपत अधिक चांगली आहे;'[16] या शब्दात अभ्यासू इंग्रज सरकासी सिंचनासारख्या दुरगामी स्थायी पर्यावर विशेष भर द्यावा असा सल्ला पत्रकर्ते देताना दिसतात.

रेल्वेवर इंग्रज सरकार अफाट खर्च करत होते. त्यात निवेश करणाऱ्या कंपन्यांना नफ्याची हमी देण्यात आली होती व आलेला तोटा कर्ज घेऊन इंग्रज सरकार भरत होते त्यामुळे दरवर्षी निव्वळ व्याज फेडण्यास सरकारचे दोन कोटीच्या वर रक्कम वाया जायची व ती भारतीय कडून करामार्फत वसूल केलेली रक्कम असायची. तेव्हा रेल्वे पेक्षा सिंचन व्यवस्थेवर सरकारने खर्च केल्यास ते लोकांच्या व सरकारच्या दोन्हीच्या फायद्याचे कसे आहे याची आकडेवारी देऊन पत्रकर्ते समजावताना, ' सरकारने रेल्वे करिता १८७२ सालापासून १०० कोटी रुपये खर्च केले व १० कोटी रुपये हिंदुस्थानात इंग्रज सरकारचा अंमल झाल्यापासून आजपर्यंत इरिगेशन खात्याकडे खर्चिले! ... तेव्हा पहा! सरकारने रेल्वे करिता थोडे वर्षात वीस कोटी रुपये तोटा भरला ... इरिगेशन करीता दहा कोटी रुपये खर्च केले गेले त्यापासून वर्षास थोडा बहुत तरी सरकारास फायदा होत आहे व पुढे होईल पण २० कोटी रुपये हिंदुस्थानातील कर देणाऱ्या रयतेपासून वसूल करून जे रेल्वेच्या हमीकरिता दिले गेले ती रक्कम कायमची नाहीशी झाली व तीजपासून काही परत मिळावयाची नाही.'[17] अश्या प्रकारे नफ्या तोट्याचे

[14] वऱ्हाड समाचार, दिनांक १८ मार्च १८७७, अकोला, पृ.२

[15] कित्ता

[16] वऱ्हाड समाचार, दिनांक १५ ऑक्टोबर १८७६, अकोला, पृ.२

[17] कित्ता

आकडे देऊन पत्रकर्ते रेल्वे पेक्षा कालवे आदि सिंचनावर सरकारने अधिक भर दिल्यास रयतेबरोबरच सरकारचाही फायदा होतो असेपरकीय व्यापारी सरकारला व्यापारी भाषेत सुचवितांना दिसतात.

'वऱ्हाड समाचार' नी भारतीयांच्या आर्थिक जागृतीविषयक कार्यात भारतातील १८७६-७८ या वर्षी पडलेल्या दुष्काळा संदर्भाने जे लिखाण केले आहे त्यातून भारतातील लोकांच्या हिताकरिता कोणकोणत्या उपायाने दुष्काळा सारख्या संकटात त्यांना दिलासा मिळेल ते पुन्हा नव्याने उभे राहतील या करिता अत्यंत पोट तिडकीने लिखाण केले होते. इंग्रज सरकारला वेळोवेळी उचित उपाय सुचवितानाच उदारवादाचा ढोंग करून बसलेल्या इंग्रज सरकारचा खरा व्यापारवादी-साम्राज्यवादी चेहरा वाचकांपुढे निर्भीड पाने मांडला होता . त्यांचे हे कार्य पत्रकारितेच्या मूल्याशी असलेली प्रतिबद्धता दर्शविते.

## तळटीपा (संदर्भ सूची)


१.मेश्राम संगीता, राजकीय प्रबोधन आणि मराठी वृत्तपत्रे,विसाबुक्स प्रकाशन ,नागपूर,२००८ पृ. ६

२.लेले.रा.के.,मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, कॉन्टीनेन्टल प्रकाशन,पुणे,चतुर्थ आवृत्ती२०२० पृ ५८.

३.वऱ्हाड समाचार, अंक४२ दिनांक २२ ऑक्टोबर १८७६, अकोला, पृ. २

४.कित्ता

५.वऱ्हाड समाचार, अंक ३२दिनांक १२ ऑगस्ट १८७७, अकोला, पृ.२

६.कित्ता

७.कित्ता

८.वऱ्हाड समाचार , अंक ३५दिनांक २ सप्टेंबर १८७७ अकोला,पृ,२

९.वऱ्हाड समाचार , अंक ११दिनांक १८ मार्च १८७७ अकोला, पृ,२

१०.वऱ्हाड समाचार, अंक २२ दिनांक ३ जून १८७७, अकोला, पृ.२

११.वऱ्हाड समाचार, दिनांक ५ नोव्हेंबर १८७६, अकोला, पृ.२

१२.कित्ता

१३. कित्ता

१४.वऱ्हाड समाचार, दिनांक १८ मार्च १८७७, अकोला, पृ.२

१५.कित्ता

१६.वऱ्हाड समाचार, दिनांक १५ ऑक्टोबर १८७६, अकोला, पृ.२

१७.कित्ता